# यावल महाविद्यालयाची प्लास्टिक मुक्त भारत अभियान रॅली उत्साहात.

यावल (प्रतिनिधी)- येथील ज. जि. म. वि. प्र. सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना एकक व यावल नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक मुक्त भारत अभियान रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व यावल नगरपरिषद मुख्याधिकारी श्री. मनोज म्हसे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले.

प्रारंभी या अभियानात प्लास्टिक मुक्त व पर्यावरण जनजागृतीची प्रतिज्ञा घेण्यात आली. महाविद्यालयातील परिसरात प्लास्टिक व कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

रॅली ची सुरुवात महाविद्यालयाच्या मैदानापासून होऊन बस स्थानक परिसर, टी पॉईंट, बुरुज चौक, पोलीस स्टेशन, ग्रामीण रुग्णालय मार्गे तहसील कार्यालयात यावल तहसीलचे तहसीलदार श्री. महेश पवार यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला.

दरम्यान यावल बस स्थानक, ग्रामीण रुग्णालय व तहसील कार्यालय आदी परिसरात प्लास्टिक व कचरा संकलन करून सोबत असलेली कचरा गाडीत जमा करून प्लास्टिक व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. सदर वरील परिसरात प्लास्टिक वापर व प्लास्टिक निर्मूलन बाबत जनजागृती करण्यात आली तसेच विविध घोषणा देण्यात आल्या. या अभियानात स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या अभियानात उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, प्रा. एम. डी. खैरनार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. डी. पवार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नगरपरिषद यावल शहर समन्वयक श्री. तुकाराम सांगळे, स्वच्छता निरीक्षक वीरेंद्र घारू, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. सुधा खराटे, श्री महेश जाधव, श्री सि. टी. वसावे, स्वच्छता कर्मचारी दिनेश घारू आदी सहभागी होते.

प्लास्टिक मुक्त अभियान रॅलीचे यशस्वीतेसाठी मिलिंद बोरघडे, प्रमोद कदम, अनिल पाटील, संतोष ठाकूर , नवमेश तायडे, टिनू पाटील, तेजश्री कोलते, प्राची पाटील, चेतना कोळी आदींनी परिश्रम घेतले.

# पुण्य नगरी

## यावल महाविद्यालयाची प्लास्टिक मुक्त भारत अभियान रॅली उत्साहात



यावल : येथील ज. जि. म. वि. प्र. सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना एकक व यावल नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक मुक्त भारत अभियान रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व यावल नगरपरिषद मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले.

प्रारंभी या अभियानात प्लास्टिक मुक्त व पर्यावरण जनजागृतीची प्रतिज्ञा घेण्यात आली. महाविद्यालयातील परिसरात प्लास्टिक व कचऱ्याचे संकलन करण्यात आले. रॅली ची सुरुवात महाविद्यालयाच्या मैदानापासून होऊन बस स्थानक परिसर, टी पॉईंट, बुरुज चौक, पोलीस स्टेशन, ग्रामीण रुग्णालय मार्गे तहसील कार्यालयात यावल तहसीलचे तहसीलदार श्री. महेश पवार यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला.

दरम्यान यावल बस स्थानक, ग्रामीण रुग्णालय व तहसील कार्यालय आदी परिसरात प्लास्टिक व कचरा संकलन करून सोबत असलेली कचरा गाडीत जमा करून प्लास्टिक व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. सदर वरील परिसरात प्लास्टिक वापर व प्लास्टिक निर्मूलन बाबत जनजागृती करण्यात आली तसेच विविध घोषणा देण्यात आल्या. या अभियानात स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या अभियानात उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, प्रा. एम. डी. खैरनार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. डी. पवार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नगरपरिषद यावल शहर समन्वयक श्री. तुकाराम सांगळे, स्वच्छता निरीक्षक वीरेंद्र घारू, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. सुधा खराटे, श्री महेश जाधव, श्री सि. टी. वसावे, स्वच्छता कर्मचारी दिनेश घारू आदी सहभागी होते.प्लास्टिक मुक्त अभियान रॅलीचे यशस्वीतेसाठी मिलिंद बोरघडे, प्रमोद कदम, अनिल पाटील, संतोष ठाकूर, नवमेश तायडे, टिनू पाटील, तेजश्री कोलते, प्राची पाटील, चेतना कोळी आदींनी परिश्रम घेतले.

Smart Jalgaon Edition
Oct 19, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

दिव्य मराठी
भुसावळ 19-10-2022

# यावल महाविद्यालय, पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिकमुक्त भारत अभियान रॅली

प्रतिनिधी | यावल


यावल येथे काढण्यात आलेल्या प्लास्टिकमुक्त भारत अभियान रॅलीत फलकांसह सहभागी विद्यार्थिनी.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागातील परिपत्रकानुसार राष्ट्रीय सेवा योजना एकक व यावल नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक मुक्त भारत अभियान रॅलीचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे व पालिकेच्या मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. प्रारंभी या अभियानात प्लास्टिक मुक्त व पर्यावरण जनजागृतीची प्रतिज्ञा घेण्यात आली. महाविद्यालयातील परिसरात प्लास्टिक व कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

या रॅलीची सुरुवात महाविद्यालयाच्या मैदानापासून झाली. तेथून रॅली बस स्थानक परिसर, टी पॉइंट, बुरुज चौक, पोलिस स्टेशन, ग्रामीण रुग्णालय या मार्गे तहसील कार्यालयात पोहोचली. तेथे तहसीलदार महेश पवार यांच्या उपस्थितीत रॅलीचा समारोप करण्यात आला. दरम्यान यावल बस स्थानक, ग्रामीण रुग्णालय व तहसील कार्यालय आदी परिसरातून प्लास्टिक व कचरा संकलित करून सोबत असलेल्या गाडीत जमा केला. त्यानंतर या प्लास्टिक व कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी त्या-त्या परिसरात प्लास्टिकचा वापर व त्याचे निर्मूलन याबाबत विविध घोषणा देत जागृती करण्यात आली. या अभियानात रासेयो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या अभियानात मान्यवरही सहभागी झाले.